RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १३६(२)] गुरुवार, ऑक्टोबर ३०, २०२५/कार्तिक ८, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४७४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ ऑक्टोबर २०२५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीएचए-२०१४/६४१/प्र.क्र.११६/कार्या-१.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, "धर्मादाय संघटनेच्या कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी, गट-ब (*राजपत्रित*), (सेवाप्रवेश) नियम, २०२४" यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत, ते असे :—

१. या नियमांना "धर्मादाय संघटनेच्या कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी, गट-ब (*राजपत्रित*), (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०२५" असे संबोधण्यात यावे.

२. "धर्मादाय संघटनेच्या कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी, गट-ब (*राजपत्रित*), (सेवाप्रवेश) नियम, २०२४" (यापुढे "मुख्य नियम" असे संबोधित) च्या नियम ३ मधील खंड (क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल. :—

"(क) अधीक्षक, गट ब (अराजपत्रित) हे पद धारण करणाऱ्या व त्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंडित सेवा झालेल्या व्यक्तींमधून, सेवाज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीकरिता पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल :

परंतु असे की, अधीक्षक, गट ब (अराजपत्रित) पद धारण करणारी व त्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंडित सेवा असणारी व्यक्ती, तिला प्रशासकीय अधिकारी किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यापैकी कोणत्या पदावर पदोन्नती हवी आहे, याबाबतचा विकल्प देईल आणि असा एकदा दिलेला विकल्प कोणत्याही परिस्थितीत पुन्हा बदलता येणार नाही ; किंवा"

३. मुख्य नियमातील नियम ४ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल. :—

"प्रशासकीय अधिकारी, गट ब (*राजपत्रित*) पदावरील नियुक्ती, पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे ५०:५० या प्रमाणात करण्यात येईल :

परंतु असे की, सदर प्रमाण, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते प्रशासकीय निकड असल्यास, तशी लेखी कारणे नमूद करून, आवश्यकतेनुसार, शिथिल करता येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनिषा कदम,**
शासनाचे सहायक सॉलिसिटर-नि-उप सचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai, 400 032, Dated the 29th October, 2025.

*NOTIFICATION*

Constitution Of India.

No.CHA-2014/641/C.R.116/Desk-1.- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and of all other powers enabling in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the "Administrative Officer, Group "B" (*Gazetted*) in the Office of the Charity Organisation (Recruitment) Rules, 2024" as follows, namely :—

**1.** These rules may be called "the Administrative Officer, Group "B" (*Gazetted*) in the Office of the Charity Organisation (Recruitment) (Amendment) Rules, 2025".

**2.** In rule 3 of the "Administrative Officer, Group "B" (*Gazetted*) in the Office of the Charity Organisation (Recruitment) Rules, 2024" (hereinafter referred to as "the principal rules"), for clause (*a*), the following clause shall be substituted, namely :—

"(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Superintendent, Group-B (*Non-Gazetted*) and having not less than three years regular and continuous service on that post :

Provided that, a person holding the post of Superintendent, Group-B (*Non-Gazetted*) and having not less than three years regular and continuous service on that post shall give an option either he desires to be promoted on the post of Administrative Officer or Assistant Charity Commissioner and such an option once opted shall not be changed in any circumstances; or"

3. For rule 4 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"4. Appointment to the post of Administrative Officer, Group-B (*Gazetted*) shall be made by promotion and nomination in the ratio of 50:50 :

Provided that, in the opinion of the Appointing Authority, if the exigencies in the services so requires, for reasons to be recorded in writing, the ratio prescribed in this rule shall be relaxed."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANISHA KADAM,
Assistant Solicitor-*cum*-Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.